मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# नगरसदस्य, नगरसदस्या यांच्या तक्रारींना प्राधान्य!

## महापौर रवि लांडगे : फ क्षेत्रीय कार्यालयातील विविध विभागांचा आढावा

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्यासाठी महापालिकेच्या विविध विभागांनी समन्वयाने काम करणे अत्यावश्यक आहे. शहर स्वच्छ, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख ठेवण्यासाठी प्लास्टिकबंदीची प्रभावी अंमलबजावणी, कचरा टाकल्या जाणाऱ्या ठिकाणांचे सुशोभीकरण, अतिक्रमणांवर कारवाई करताना फेरीवाल्यांसाठी पर्यायी व्यवस्था तसेच पावसाळ्यापूर्वी नालेसफाईसह आवश्यक पायाभूत कामे वेळेत पूर्ण करणे यावर विशेष भर देणे आवश्यक आहे. याशिवाय, नागरिक व नगरसदस्यांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा विहीत वेळेत निपटारा करून प्रशासनाने जबाबदारीने काम करणे गरजेचे असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य, अतिक्रमण, पाणीपुरवठा, स्थापत्य, उद्यान, पशुवैद्यकीय आदी विभागांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन निगडी येथील 'फ' क्षेत्रीय कार्यालय येथे करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीत प्रभागातील स्वच्छता, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते व पायाभूत सुविधा, उद्याने तसेच नागरी सुविधा यासंदर्भातील कामांचा विभागनिहाय आढावा यावेळी घेण्यात आला. तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तातडीने निराकरण करणे तसेच प्रलंबित विकासकामांना गती देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी यावेळी चर्चा करण्यात आली.

या बैठकीत महापौरांनी प्रशासनाला स्पष्ट आणि ठोस सूचना दिल्या. शहरातील स्वच्छता, अतिक्रमण नियंत्रण, पाणीपुरवठा, उद्यान व्यवस्थापन आणि पशुवैद्यकीय सेवा या सर्व विभागांनी अधिक समन्वयाने आणि वेळेत काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्लास्टिकबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याला प्राधान्य द्यावे, ज्या ठिकाणी नागरिक वारंवार कचरा टाकतात त्या ठिकाणी सुशोभीकरण करून तेथील परिस्थितीत बदल घडवावा, तसेच फेरीवाल्यांच्या अतिक्रमणावर कारवाई करताना त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशा सूचना त्यांनी दिल्या. पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे तातडीने सुरू करून वेळेत पूर्ण करावीत, उघड्या गटारे व नाल्यांवर सुरक्षेच्या दृष्टीने जाळ्या बसवाव्यात, तसेच शहरातील विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईनची स्वच्छता करण्यासाठी आवश्यक मशिनरींची संख्या वाढवावी, असेही त्यांनी सांगितले.

याशिवाय, महापालिकेच्या विविध विभागांनी नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या प्राधान्याने सोडविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. प्लास्टिकबंदीची काटेकोर अंमलबजावणी, शहर स्वच्छ व सुशोभित ठेवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, तसेच अतिक्रमणाबाबत प्रभावी कारवाई करताना फेरीवाल्यांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई पूर्ण करणे, उघड्या नाल्यांवर जाळ्या बसविणे आणि ड्रेनेज स्वच्छतेसाठी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करणे यावर विशेष भर द्यावा. तसेच नगरसदस्य व नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा विहीत वेळेत निपटारा करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा. क्षेत्रीय कार्यालयनिहाय श्वान संगोपन केंद्र उभारण्यासाठी नगरसदस्यांसमवेत संभाव्य जागांची पाहणी करावी. या सर्व कामांचा पुढील तीन महिन्यांनी पुन्हा आढावा घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी कार्यालयीन संरचना, अतिक्रमण कारवाईचा अहवाल, पोर्टवरील तक्रारींचा निपटारा व प्रलंबित तक्रारी, उत्पन्न व जमा रकमेचा तपशील आदी बाबींबाबत संगणकीय सादरीकरणाद्वारे महापौर रवि लांडगे यांना माहिती दिली. तसेच नगरसदस्यांनीही प्रभागात आवश्यक असलेल्या सोयीसुविधा आणि समस्या महापौर लांडगे यांच्यासमोर मांडल्या.

# 'पीएमपीएमएल' कर्मचाऱ्यांच्या सातवा वेतन आयोग फरकाचा प्रश्न मार्गी!

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; महापालिका हिस्स्याची थकीत रक्कम अदा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळातील ('पीएमपीएमएल') कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार थकीत असलेला फरक लवकरच मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ४०% हिस्स्यानुसार 56.10 कोटी रुपये त्वरित महामंडळाला दिली जाणार आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. महापालिका हिस्स्याची थकीत रक्कम 'पीएमपीएमएल'कडे वितरीत करण्यात येणार आहे.

सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर कर्मचाऱ्यांना फरक देण्याची प्रक्रिया हळूहळू सुरू झाली होती. यापूर्वी पहिल्या हप्त्याचे वितरण पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पुढाकारातून पूर्ण झाले होते, मात्र दुसऱ्या हप्त्याबाबत विलंब झाला होता. याबाबत भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी महापालिका प्रशासनाकडे पीएमपीच्या कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. तसेच, 'पीएमपीएमएल' कर्मचाऱ्यांच्या वतीने रवींद्र लांडगे, संतोष काळजे, दिनकर काळजे आणि उमेश धावडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.



> पीएमपीएमएल'च्या सर्व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाचा फरक लवकर मिळेल यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न केले आहेत. दुसऱ्या हप्त्यासह उर्वरित हप्ताही लवकर वितरीत करण्यात येतील. कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम योग्य वेळेत मिळणे हे आमचे प्राधान्य आहे. या निर्णयामुळे सर्व कर्मचारी समाधानी होतील आणि महामंडळाच्या कार्यप्रणालीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्यासह चर्चा करून आमदार लांडगे यांनी पहिल्या फरकाच्या हप्त्याचे वितरण सुनिश्चित केले होते. त्यानंतर दुसऱ्या हप्त्यासाठी आयुक्त श्रावण हार्डीकर यांना सातत्याने सूचना देऊन रक्कम लवकर काढण्याचे प्रयत्न केले. संबंधित बैठकीत पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त, कामगार संघटना पदाधिकारी आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग होता. या चर्चेत निर्णय घेण्यात आला की, महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाचा फरक चार हप्त्यांमध्ये वितरीत केला जाईल.

आमदार लांडगे म्हणाले की, “दुसऱ्या हप्त्याबरोबरच उर्वरित दोन हप्तेसुद्धा लवकर वितरीत केले जातील. कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम योग्य वेळी मिळावी. हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या हितासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. महामंडळाकडून 2025-26 च्या अंदाजपत्रकात आर्थिक तूट लक्षात घेऊन पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका स्वतःच्या उत्पन्नातून फरक भरून देणार आहेत.

# शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधा :महापौर रवि लांडगे

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाचा घेतला आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आढावा बैठक पार पडली. यावेळी शहरातील भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासोबतच त्यांचे संगोपन, आरोग्य सेवा आणि नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण यासाठी ठोस उपाययोजना करा. पिंपरी चिंचवड शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधा, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्या वैशाली काळभोर, वैशाली घोडेकर, अर्चना सस्ते, नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, मंदार देशपांडे, उत्तम केंदळे, संजय काटे, सुहास कांबळे, उपायुक्त संदीप खोत, अण्णा बोदडे, पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान महापौर रवि लांडगे यांनी शहरात श्वान संगोपन केंद्र उभारण्याबाबत विशेष भर देत, यासाठी प्रभागनिहाय उपलब्ध जागांची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. या केंद्रांच्या माध्यमातून भटक्या श्वानांचे संगोपन, लसीकरण, उपचार तसेच नसबंदी प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविता येईल, असे त्यांनी नमूद केले. यासाठी संबंधित नगरसदस्यांच्या सहकार्याने प्रभागनिहाय योग्य



जागा निश्चित करून त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

तसेच शहरातील भटक्या व पाळीव श्वानांची अचूक संख्या, त्यांचे वितरण तसेच नसबंदी आणि लसीकरणाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्याचे आदेश महापौरांनी दिले. शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या श्वानांबाबतच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निवारण करण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने समन्वयाने काम करण्याचेही त्यांनी सांगितले.

शहरातील भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे आरोग्य संवर्धन करणे तसेच नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने अधिक नियोजनबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने काम करावे, असे निर्देशही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी दिले.

### नसबंदी मोहिमेसाठी सध्या चार विशेष वाहने...

» यावेळी उपायुक्त संदीप खोत यांनी पशुवैद्यकीय विभागामार्फत करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शहरात प्राणी जन्मनियंत्रण (ABC) अंतर्गत नसबंदी मोहिमेसाठी सध्या चार विशेष वाहने कार्यरत असून, या वाहनांद्वारे श्वान पकडणे, नसबंदी करणे आणि त्यांना पुन्हा त्यांच्या परिसरात सोडणे ही प्रक्रिया राबविली जात आहे. तसेच जखमी किंवा आजारी प्राण्यांवर उपचार करणे आणि नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्यासाठीही ही वाहने वापरण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले असून, प्राण्यांशी संवेदनशील पद्धतीने वागण्याबाबत विशेष मार्गदर्शनही देण्यात आले आहे. श्वान संगोपन केंद्र उभारण्यासाठी शहरातील काही संभाव्य जागांची प्राथमिक पाहणी देखील करण्यात आली असून, त्याबाबत पुढील कार्यवाही सुरू असल्याचे उपायुक्त खोत यांनी सांगितले.

# शहरातील मुलींच्या आरोग्य संरक्षणासाठी महिला 'एचपीव्ही लसीकरण मोहीम' सुरु

## 14 वर्षांच्या मुलींसाठी महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये मोफत लसीकरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकारतर्फे महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २८ फेब्रुवारी २०२६ रोजी देशव्यापी एचपीव्ही लसीकरण कार्यक्रम सुरू झाला आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत नवीन सांगवी रुग्णालयात सदर मोहिमेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये २४ लाभार्थ्यांनी या लसीकरणाचा लाभ घेतला.

महापौर रवी लांडगे व आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या मोहिमेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये १४ वर्षे पूर्ण पण १५ वर्षांखालील मुलींसाठी एचपीव्ही लस मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मोहीम ही पुढील ३ महिने चालणार आहे. HPV ही लस सुरक्षित, प्रमाणित आणि वैज्ञानिकदृष्ट्या प्रभावी असल्याने पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण वेळेत करून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून करण्यात आले आहे.

भारत सरकारच्या सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार १४ वर्षांच्या मुली (ज्यांनी १४ वा वाढदिवस साजरा केला आहे पण १५ वर्षे पूर्ण झालेली नाहीत) या एचपीव्ही लसीसाठी पात्र आहेत. जगभरात एचपीव्ही लसीचा पुरवठा मर्यादित असल्यामुळे, सध्या या वयोगटावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, जेणेकरून १५ वर्षांच्या उंबरठ्यावर असलेल्या मुलींना वेळेत संरक्षण मिळू शकेल.

सर्व मनपा रुग्णालयामध्ये



सकाळी ९.३० ते दुपारी २ पर्यंत मोफत लसीकरण सत्र सुरु राहतील. नागरिकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेद्वारे संचलित यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, पिंपरी; तालेरा रुग्णालय, चिंचवड; नवीन भोसरी रुग्णालय, भोसरी; इंदिरा गांधी प्रसूती गृह ,सांगवी रुग्णालय, सांगवी; नवीन थेरगाव रुग्णालय, थेरगाव; जिजामाता रुग्णालय, पिंपरी तसेच कै.ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय, आकुर्डी, यमुनानगर रुग्णालय, यमुनानगर येथे संपर्क साधून मोफत एचपीव्ही लसीकरणाचा लाभ घ्यावा. तसेच लस घ्यायला येताना आधार, शाळेचे ओळखपत्र ( I CARD ) तत्सम ओळख पत्र घेऊन आणि भरपेट नाश्ता करून पालकांनी मुलींना घेऊन यावे , असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने केले आहे.

### लसीकरणासाठी अपात्र परिस्थिती..

खालील परिस्थितींमध्ये एचपीव्ही लसीकरण दिले जाणार नाही किंवा पुढे ढकलले जाईल,

» १४ वर्षांच्या लक्ष्य वयोगटाबाहेरील मुली
» पूर्वी एचपीव्ही लस (गार्डासिल किंवा सर्वाव्हॅक) घेतलेली असल्यास
» लस किंवा तिच्या घटकांमुळे (यीस्ट) तीव्र ॲलर्जीचा इतिहास असल्यास
» मध्यम ते गंभीर आजार असल्यास – पूर्णपणे बरे झाल्यानंतरच लसीकरण करावे.

> "महिलांच्या आरोग्याचे संरक्षण ही महापालिकेची महत्त्वाची जबाबदारी आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी एचपीव्ही लसीकरण हा प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील १४ वर्षांच्या मुलींसाठी ही लस मोफत उपलब्ध करून देत आहे. पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींचे लसीकरण करून या आरोग्य उपक्रमाला प्रतिसाद द्यावा.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.

# जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी चुरस

## तुषार थोरात, अंकिता पाटील-ठाकरे, विक्रम खुटवड यांच्यात प्रमुख स्पर्धा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने मोठे यश मिळवत 73 पैकी तब्बल 51 जागांवर विजय मिळविला आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही गटांनी एकत्र येत निवडणूक लढविल्याने सत्तेचा मार्ग सुकर झाला आहे. मात्र, आता जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी जोरदार चुरस निर्माण झाली असून, कोणाला संधी मिळणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अध्यक्षपदासाठी तीन माजी आमदारांच्या वारसांमध्ये प्रमुख स्पर्धा पाहायला मिळत आहे. दौंडचे माजी आमदार रमेश थोरात यांचे चिरंजीव तुषार थोरात, इंदापूरचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील-ठाकरे आणि भोरचे माजी आमदार काशिनाथ खुटवड यांचे चिरंजीव विक्रम खुटवड हे तिघेही जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले आहेत. यामध्ये अंकिता पाटील-ठाकरे या सलग दुसऱ्यांदा विजयी झाल्या असून, तुषार थोरात आणि विक्रम खुटवड हे पहिल्यांदाच जिल्हा परिषदेत पोहोचले आहेत.

दौंड तालुक्यातील केडगाव-बोरीपारधी गटातून तुषार थोरात यांनी भाजप उमेदवाराचा पराभव करत विजय मिळविला. दौंडमध्ये माजी आमदार रमेश थोरात आणि भाजपचे आमदार राहुल कुल यांच्यात पारंपरिक राजकीय संघर्ष पाहायला मिळतो. कुल यांनी प्रयत्न करूनही थोरात गटाचा पराभव करण्यात अपयश आले.




इंदापूर तालुक्यातील बावडा गटातून अंकिता पाटील-ठाकरे यांनी सलग दुसऱ्यांदा विजय मिळवून आपले राजकीय बळ सिद्ध केले आहे, तर भोर तालुक्यातील कामथडी-भोंगवली गटातून विक्रम खुटवड विजयी झाले असून त्यांची पत्नी तृप्ती खुटवड या पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आल्या आहेत. खुटवड कुटुंबाचा स्थानिक राजकारणात मोठा प्रभाव मानला जातो.

दरम्यान, अध्यक्षपदासाठी आणखी काही नावे चर्चेत आहेत. आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील तसेच दौंड तालुक्यातील ज्येष्ठ सदस्य वीरधवल जगदाळे यांनाही संभाव्य दावेदार मानले जात आहे. अंतिम निर्णय राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार घेणार असून त्या कोणाला अध्यक्षपदाची संधी देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भीमाशंकर मंदिराशेजारील घरांच्या स्थलांतराचा प्रस्ताव

## जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात येणार 10 एकर जागा

**पुणे | प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भीमाशंकर येथील गावठाण शेजारील दीडशे मीटर लांब जागेत हलविण्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने तयार केला आहे. हा प्रस्ताव ग्रामस्थांपुढे ठेवण्यात आला असून, ग्रामस्थांच्या प्रतिसादानंतर त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे. दोन वर्षांनंतर होऊ घातलेल्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर हा प्रस्ताव तयार केला आहे. या प्रस्तावामुळे सुमारे ११० घरांना सुनियोजित ठिकाणी हलविण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी हा प्रस्ताव स्वीकारल्यानंतरच हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत हा प्रस्ताव ग्रामस्थांपुढे ठेवला आहे. दोन वर्षांनंतर होऊ घातलेल्या कुंभमेळ्याला दररोज सुमारे एक लाख भाविक मंदिराला भेट देण्याची शक्यता आहे. मंदिरासभोवती असलेल्या गावामुळे या परिसरात चेंगराचेंगरी तसेच आगीच्या घटना घडू शकतात. या ठिकाणी असलेल्या ११० घरांमुळे मंदिराला येण्यासाठीचा रस्ता अरुंद होतो. त्यामुळे या ठिकाणी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सध्याच्या दाट वस्तीमुळे अग्निशमन दलाच्या गाड्या आणि रुग्णवाहिकांसाठी आवश्यक असलेला आपत्कालीन प्रवेश मार्ग तयार करणे शक्य होत नाही.

ही स्थिती राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या नियमांविरोधी. हे भाविकांसाठी असुरक्षित आहे. भीमाशंकर मंदिराचा परिसर हा पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील असून, या भागातील मानवी वस्तीमुळे



प्रक्रिया न केलेले सांडपाणी, घनकचरा निर्माण होतो तसेच शेकरूच्या अधिवासारवरही परिणाम होत आहे. त्यामुळे या अभयारण्याची परिसंस्था धोक्यात आहे.

हे लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने या गावठाणाचे स्थलांतर करण्याचा प्रस्ताव या ग्रामस्थांपुढे ठेवला आहे. या ११० घरांना स्थलांतरित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने साडेदहा एकर खासगी जागा निश्चित केली आहे. ही जागा त्याच परिसरात असल्याने ग्रामस्थांसाठी त्यांच्या पारंपरिक जागा कायम राहाणार आहे. या प्रस्तावावर ग्रामस्थांनी चर्चा करून आपले मत जिल्हा प्रशासनाला कळवावे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सुचविले आहे.

# ‘जुन्नर’मध्ये दोन्ही शिवसेनेत युती

## सभापतीपदी शिवसेना शिंदे पक्षाच्या कमल शेळकंदे

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती या पदांच्या निवडणुकीत शिवसेना (शिंदे) आणि शिवसेना (ठाकरे) या दोन्ही शिवसेनेमध्ये युती झाली. त्यामुळे सभापतीपदी शिवसेना (शिंदे) पक्षाच्या कमल शेळकंदे, तर उपसभापतीपदी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे अमित ढोले यांची निवड झाली. शिवसेना (शिंदे) पक्षाने महायुतीतील भाजपची साथ न घेता शिवसेना (ठाकरे) पक्षाला बरोबर घेतल्याने भाजप सत्तेपासून दूर राहिली आहे.

या पंचायत समितीत शिवसेना (शिंदे) पक्षाचे आठ सदस्य निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे सहा सदस्य विजयी झाले. भाजप आणि शिवसेना (ठाकरे) पक्षाचा प्रत्येकी एक सदस्य निवडून आला. त्यामुळे त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली. शिवसेना (शिंदे) पक्षाला सत्ता मिळविण्यासाठी शिवसेना (ठाकरे) किंवा भाजप यापैकी एका पक्षाचा पाठिंबा आवश्यक होता. मात्र, शिवसेना (शिंदे) पक्षाने महायुतीतील भाजपचा पाठिंबा न घेता शिवसेना (ठाकरे) पक्षाला उपसभापतीपद देऊन सत्ता काबीज केली.

यावेळी आमदार शरद सोनवणे, माजी आमदार बाळासाहेब दांगट, शिवसेना तालुकाप्रमुख योगेश पाटे, नेताजी डोके, सचिन वाळुंज, संतोष चव्हाण आदी उपस्थित होते. निकालानंतर झालेल्या विजयी सभेमध्ये आमदार शरद सोनवणे म्हणाले, ‘जुन्नर पंचायत समितीवर



शिवसेनेचा भगवा फडकला आहे. पंचायत समिती उपसभापती पदाबाबत वरिष्ठांशी चर्चा करूनच अमित ढोले यांना हे पद देण्यात आले आहे.’ ‘पाठिंबा देण्यात आला असला, तरी शिवसेना (ठाकरे) पक्षातच राहणार आहे.’ उपसभापती ढोले म्हणाले.

---

# मावळ पंचायत समितीवर 33 वर्षांनी ‘राष्ट्रवादी’ची सत्ता

## खराडी पोलिसांनी कारवाई करून 45 बुलेट चालकांना पकडले

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ पंचायत समितीच्या सभापतीपदी सुनीता येवले आणि उपसभापतीपदी साहेबराव कारके यांची सोमवारी बिनविरोध निवड झाली आहे. पंचायत समितीवर ३३ वर्षांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार) झेंडा फडकला आहे. आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीमध्ये सभापती येवले आणि कारके यांनी पदभार स्वीकारला. तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, रमेश साळवे, विठ्ठल शिंदे, बबन भेगडे, गणेश ढोरे, पुजा बुट्टे, दिपक हुलावळे, नारायण भालेराव यावेळी उपस्थित होते.

मावळ पंचायत समितीची सदस्य संख्या दहा आहे. फेब्रुवारी महिन्यात पार पडलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे दहाही सदस्य निवडून आले आहेत. भाजपचा एकही सदस्य निवडून आला नाही. भाजपला २० वर्षांची सत्ता गमवावी लागली. निकालाच्या दिवशीच आमदार शेळके यांनी सभापतीपदासाठी





येवले आणि उपसभापतीपदासाठी कारके यांच्या नावाची घोषणा केली होती. त्यानुसार सभापतीपदासाठी येवले आणि उपसभापतीसाठी कारके यांचे एकमेव अर्ज दाखल झाले होते. दोघांचीही बिनविरोध निवड झाली.

‘मावळ पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेसचा ३३ वर्षांनी झेंडा फडकला आहे. तालुक्याचा सर्वांगीण विकास आणि ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी पदाधिकारी जोमाने काम करतील’, असा विश्वास आमदार शेळके यांनी व्यक्त केला. खेड पंचायत समितीच्या सभापतीपदी विद्या मोहिते ; उपसभापतीपदी मंगेश सावंत खेड पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेच्या (ठाकरे) विद्या मोहिते आणि उपसभापती पदी मंगेश सावंत यांची निवड झाली. सभापती मोहिते आणि उपसभापती सावंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या उमेदवारांचा दोन मतांनी पराभव केला.

आमदार बाबाजी काळे, जिल्हा परिषद सदस्य तनुजा घनवट, दीप्ती भोगाडे, विनया मुंगसे, गणेश आरगडे यावेळी उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत खेडच्या १६ पैकी नऊ जागा शिवसेना (ठाकरे) पक्षाने जिंकल्या होत्या. एकहाती सत्ता मिळवत आमदार काळे यांनी वर्चस्व निर्माण केले होते.

सभापती आणि उपसभापतीपदासाठी सोमवारी निवडणूक प्रक्रिया पार पडली. शिवसेनेकडून सभापतीपदासाठी मोहिते आणि उपसभापतीपदासाठी सावंत, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या अश्विनी तरस यांनी सभापतीपदासाठी आणि निखिल थोरवे यांनी उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला होता. शिवसेनेच्या उमेदवारांना नऊ मते पडली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रत्येकी सात मते मिळाली. निवडणूक अधिकारी अनिल दौंडे यांनी सभापतीपदी शिवसेनेच्या मोहिते आणि उपसभापतीपदी सावंत यांच्या निवडीची घोषणा केली. त्यानंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी पंचायत समिती आवारात भांड्याची उधळण करीत जल्लोष केला.